दि शहादा पीपल्स् को-ऑप बँक लि.,

शहादा, जि. नंदुरबार

THE SHAHADA PEOPLE'S CO-OP. BANK LTD.
SHAHADA DIST. NANDURBAR
SINCE 1950

आपुलकी आणि सुरक्षितता हीच ओळख

७७ वा वार्षिक अहवाल

सन २०२५-२६

ऑडिट वर्ग - 'अ'

अविरत सेवा सचोटी व विश्वासाची ७६ वर्षे.....

विश्वास • पारदर्शकता • प्रगती • समृध्दी




प्रकाशक

श्री.प्रकाशचंद आसकरण जैन

प्रेसिडेंट

संस्थापक



स्व.मंगेश भबुता पटेल

प्रेरणास्थान



स्व.पुखराज संपतलाल जैन

– भावपूर्ण श्रध्दांजली –



स्व.जसराजजी भिकमचंदजी जैन
माजी संचालक



स्व.विजयकुमारजी दिपचंदजी छाजेड
माजी संचालक

स्व.जसराजजी भिकमचंदजी जैन व स्व.विजयकुमारजी दिपचंदजी छाजेड यांचे वृध्दापकाळाने निधन झाले.
त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना तसेच
अहवाल सालात मृत पावलेले देशभक्त, स्वातंत्र्य सेनानी, थोर नेते, धरातीर्थ पडलेले जवान,
शेतकरी, लेखक, संशोधक, कवी, साहित्यीक, कलावंत, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, खेळाडू,
सामाजिक व सहकारी कार्यकर्ते तसेच आपल्या बँकेचे सभासद, ठेवीदार,
हितचिंतक व बँकेचे माजी सेवक दिवंगत झाले अशा सर्वांना
नम्रतापूर्वक अभिवादन करून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण
करित आहोत.

त्यांच्या विचारांचे स्मरण आम्हांस प्रगतीचा मार्ग दाखविल.
ईश्वर त्यांच्या आत्म्यांस चिरशांती व सद्गती देवो,
हिच परमेश्वर चरणी प्रार्थना !!

संचालक मंडळ, सभासद व सेवकवृंद

दि शहादा पीपल्स् को–ऑप.बँक लि.,
शहादा (जि.नंदुरबार) महाराष्ट्र

कायदेशिर सल्लागार
ॲड. श्री. के.ए.एम.काझी
ॲड.श्री.पी.पी. सावळे

अंतर्गत लेखापरिक्षण
मे.डी.सी.सी.असोसिएटस्
चार्टड अकौन्टन्टस्, नाशिक

वैधानिक लेखापरिक्षण
मे.एन.व्ही.एम. ॲण्ड असोसिएटस्
चार्टड अकौन्टन्टस्, पुणे

बँकर्स

दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप.बँक लि.मुंबई
आय.डी.बी.आय.बँक
स्टेट बँक ऑफ इंडिया
सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया

युनियन बँक ऑफ इंडिया
येस् बँक लि.
एस.व्ही.सी.को–ऑप.बँक लि.

दि धुळे व नंदुरबार जिल्हा मध्य. सह. बँक लि
बँक ऑफ बडोदा
बँक ऑफ महाराष्ट्र

संचालक मंडळ (२०२३-२०२८)


श्री.प्रकाशचंद आसकरण जैन
प्रेसिडेंट


श्री.गौतमचंद अनोपचंद जैन
व्हा.प्रेसिडेंट


सौ.सरिता प्रकाशचंद जैन
संचालिका


सौ.रिता ललित जैन
संचालिका


श्री.धिरज प्रकाशचंद जैन
संचालक


श्री.प्रदीप माणकलाल टाटीया
संचालक


श्री.भरतकुमार धनराज जैन
संचालक


श्री.युनूस युसूफ बागवान
संचालक


श्री.अरविंद चैनसुख जैन
संचालक


डॉ.राजेश दिपचंद जैन
संचालक


ॲड. चंद्रशेखर मोतीलाल संचेती
संचालक


श्री.राजेश तिलोकचंद नाहटा
संचालक


श्री.किशोर हरकचंद भंडारी
संचालक


श्री.राहुल नेमीचंद जैन
संचालक


श्री.धनंजय प्रकाश पाटील
संचालक


श्री.दिलीप गोविंद खेडकर
संचालक


श्री.मुकेश विजयसिंग पराडके
संचालक


श्री.कल्पेश नेमीचंद जैन
(सी.ए.) तज्ञ संचालक


श्री.शैलेश जेठमल जैन
(सी.ए.) तज्ञ संचालक


श्री.गिरीश मोतिलाल जैन
संचालक
(दि.०३/०७/२०२५ पासून)


श्री.नरेश लालचंद जैन (सी.ए.)
संचालक
(दि.०९/१०/२०२५ पासून)


श्री.विजयकुमार हिरालाल राखेचा
सरव्यवस्थापक

व्यवस्थापन मंडळ


श्री.प्रदीप माणकलाल टाटीया
चेअरमन


श्री.भरतकुमार धनराज जैन
सदस्य


श्री. मनोज विरचंद बाफना
सदस्य


ॲड.श्री.अक्षय सुरेश छाजेड
सदस्य


श्री.फरमेश उमेश जैन (सी.ए.)
सदस्य



मा.प्रेसिडेंट यांच्या लेखणीतून.....

From the President's Desk .....

अहवाल वर्षात आपल्या बँकेने साधलेल्या उत्तम प्रगतीसाठी दि शहादा पीपल्स को-ऑप.बँक परिवारातील सभासद,ग्राहक हितचिंतक व कर्मचारी या सर्व घटकांचे संचालक मंडळाच्यावतीने हार्दिक अभिनंदन करतो. जागतिक अर्थकारणामळे नवीन नियम ,निकष सतत बदलत आहेत. खुल्या आर्थिक धोरणामुळे तीव्र स्पर्धा निर्माण झाली आहे. ग्राहकांसमोर अनेक पर्याय निर्माण झालेले असल्याने ग्राहक समाधान ही गोष्ट खूपच अवघड बनली आहे. त्या बदलत्या काळाशी सुसंगत राहण्याचा प्रामाणिक प्रयत्न आपल्या बँकेने केल्यामुळे येऊ घातलेले नवनवीन तंत्रज्ञान काळाच्या ओघात सतत बदलत राहत असल्याने या बदलाचा वेग ही प्रचंड प्रमाणात बदलला आहे. बँकिंग क्षेत्रातील ग्राहक सेवा,व्यवसाय पध्दती, व्यवसाय वृध्दीकरीता यामध्ये पुढील काळात अजूनही मोठे बदल घडतील अशी तज्ञांची धारणा आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या बॅकेचे व्यवस्थापनाने सजगतेने या बदलांची वेळोवेळी नोंद घेऊन आपल्या व्यवसाय वाढीवर लक्ष केंद्रीत केले जात आहे.

आजपावेतो ब्रॅच बॅंकिंग किंवा बँकाचा शाखा विस्तार यावर निर्भर असलेले व्यक्तीगत आत्मीयता असलेले सहकारी बँकिंग इथुन पुढे अधिकाधिक डिजीटल होत जाणार ही काळ्या दगडावरची रेष आहे. बँकाच्या शाखा विस्तारापेक्षा ऑनलाईन ट्रान्झेक्शनवर आपल्याला भर द्यावा लागणार आहे. त्यास अनुसरून आपल्या बँकेने **NEFT, RTGS, मोबाईल बॅंकिंग, IMPS, UPI, Phonepe, Paytm, ATM, Ecom, POS, ATM Card,NACH, AEPS, ABPS** अशा सुविधा सर्व ग्राहकांकरिता सुरू केलेल्या आहे.

अहवाल सालातील घडामोडींच्या परामर्श घेतांना बँकेने साध्य केलेली सर्वतोपरी प्रगती आपले समोर मांडताना अतिशय आनंद होत आहे. बँकेच्या वाटचालीस संचालक मंडळ, व्यवस्थापन मंडळ, शाखांचे सल्लागार सदस्य, बँकेचे जनरल मॅनेजर व बँक कर्मचारी वृंद यांनी शिस्तबध्द शास्त्रोक्त व्यावसायिकता अंगी बाळगून बदलत्या बॅंकिंग व्यवसायात "ग्राहक सेवा" या शब्दाचे महत्व जाणून ग्राहकांशी आपुलकीचा संवाद साधून बँकेच्या व्यवसाय वृध्दीत यश संपादन केलेले आहे. त्याची अनुभूती म्हणजेच बँकेने अनेक पुरस्कारांवर आपली मोहोर उमटविली आहे. आनंदाने आर्वजून सांगु इच्छीतो की अविज पब्लिकेशन, कोल्हापुर यांनी मागील ६ वर्षात आपल्या बँकेला सलग ५ वेळा (२०१९,२०२१,२०२२,२०२३,२०२४) मानाचा बँको ब्ल्यु रिबन पुरस्कार मिळालेले आहेत.

बँकेने तत्कालीन व विद्यमान संचालक मंडळाचे सदस्य, व्यवस्थापकीय मंडळाचे सदस्य हे नियमित स्पर्धात्मक दृष्टीकोनासह सहकार्याची भावना जोपासून बँकेच्या कारभारात वेळोवेळी व जास्तीत जास्त सहभागी होत असतात. नवीन आव्हानांचा सामना करण्यासाठी दक्षता बाळगून रिझर्व्ह बँक व सहकार खात्याच्या ध्येय्य-धोरणानुसार भविष्यातील वाटचाल ही दिशा ठरवून बँकींग विषयक विविध कार्यशाळांमध्ये वेळोवेळी सहभागी होऊन विशेष नेतृत्व कौशल्य विकसीत करण्यासाठी प्रगल्भ होत आहेत. स्वच्छ व पारदर्शक कारभार करतानांच दुरदृष्टीने ध्येयांची आखणी व तत्परतेने निर्णायक अंमलबजावणी यामुळे बँकेचा व्यवसाय वृध्दीमध्ये सुदृढ वाढ होत राहिली आहे. कर्मचाऱ्यांना बँकेच्या कामकाजातील सहभाग व उत्साहपूर्ण योगदानाबरोबरच विनम्र आपुलकीची व जिव्हाळ्याची सेवा देत सर्वसामान्यांसाठीचे बॅंकींग करून नेत्रदिपक अशी प्रगती करीत आहोत. खऱ्या अर्थाने समाजहित साधण्यासाठी व्यावसायीकता हा गुण अंगीकारून व काळाची गरज ओळखून "एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ" या उक्तीप्रमाणे ग्राहक सेवा-सुविधा देण्यात कर्मचारी नियमीत अग्रेसर राहिले आहेत आणि यापुढे राहतील.

बँकेच्या संचालक मंडळातील सदस्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा उत्तम उपयोग होत असून ते बँकेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी ध्येमधोरणे यांची आखणी करीत असतांना बँकेच्या सर्वतोपरी विकासासाठी ठेव वृध्दी, सुरक्षित कर्जाचे वाटप, गुंतवणूकीबाबतचे निर्णय हे कुशलतेले व योग्य मार्गदर्शनाने उत्साहपूर्ण सहभाग घेऊन बँकेची दैदिप्यमान प्रगती अधोरेखीत करीत आहेत.

बँकेचा एकुण व्यवसाय मागील वर्षाच्या तुलनेत रु.६२३.४३ लाखांनी वाढून मार्च २०२६ अखेर रु.३०६१२.५८ लाखा पर्यंत झेपावला आहे. एकुण व्यवसायात झालेली वाढ २.०८ % असुन बँकेवरील समाजाच्या अढळ विश्वासाचे द्योतक आहे. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर ६७.१४ % च्या तुलनेत ठेव आणि कर्ज गुणोत्तराचे प्रमाण **CD Ratio** ३१ मार्च २०२६ अखेर ६९.५४ % पर्यंत एवढे आहे. बँकेचे नक्त मुल्य म्हणजेच **Net Worth** रू.२०.३९ कोटी असुन मागील वर्षाच्या तुलनेत त्यात ०.२५ % ची घट झालेली आहे तसेच रिझर्व्ह बँकेच्या सुधारित नियमानुसार भांडवल पर्याप्ततेचा रेशो किमान १२ % असणे आवश्यक आहे. आपल्या बँकेचा ३१/०३/२०२६ अखेरचा सदरील रेशो हा १६.३२% आहे. यातूनच आपल्या बँकेची आर्थिक सदृढता लक्षात येते आणि ते पाहता बँकेची सुरक्षितता उच्चत्तम दर्जाची असल्याची दिसून येते.

बँकेने चांगली वसुली करत ०.०० % नेट एन.पी.ए ठेवण्यात यश प्राप्त केले आहे तसेच ग्रॉस एन.पी.ए अजून कसा कमीत कमी करता येईल यासाठी मी,संचालक मंडळ, व्यवस्थापन मंडळ, सर्व शाखांचे सल्लागार समिती सदस्य, जनरल मॅनेजर, असि.जनरल मॅनेजर, विशेष वसुली व विक्री अधिकारी, वसुली अधिकारी , सर्व शाखाधिकारी व कर्मचारी प्रयत्नशिल आहोत आणि तसेच आपण सर्वांनीही वसुलीसाठी जास्तीत जास्त मदत करावी हिच माफक अपेक्षा आपणाकडे करतो. दिनांक ३१/०३/२०२६ अखेर बँकेस आयकर, एन.पी.ए तरतुद, इतर निधीची तरतुद, घसारा इत्यादी सर्व खर्च वजा जाता रु.१,२१,२४,९५०.२० पैसे इतका निव्वळ नफा झालेला आहे.

बँकेच्या या यशाचे हक्कदार असलेल्या सर्व सभासद, ग्राहक व हितचिंतक यांचे कृतज्ञतापूर्वक आभार !!!!!

हार्दिक शुभेच्छासह

दि शहादा पीपल्स् को-ऑप.बँक लि. शहादा

(जि.नंदुरबार) महाराष्ट्र

रजि.नं.१८४००/७
दिनांक-०२/०५/१९५०

रिझर्व बँक लायसन्स नं.एसीडी/एम.एच./२५३पी
दिनांक-१३/०४/१९८१

संचालक मंडळ (२०२३ ते २०२८)

अ.क्र.	नांव	गांव	हुद्दा	मोबाईल नंबर
१	श्री. प्रकाशचंद आसकरण जैन	शहादा	प्रेसिडेंट	९४२२२८७२०६
२	श्री. गौतमचंद अनोपचंद जैन	तळोदा	व्हाईस प्रेसिडेंट	९४२३९८१५५५
३	श्री. धिरज प्रकाशचंद जैन	शहादा	संचालक	९६४४७९७०००
४	श्री. ॲड.प्रदीप माणकलाल टाटीया	शहादा	संचालक	९४२२७९१५२६
५	श्री. भरतकुमार धनराज जैन	शहादा	संचालक	८६००४९९०९१
६	श्री. युनूस युसूफ बागवान	शहादा	संचालक	९५२७७०७०७०
७	श्री. अरविंद चैनसुख जैन	खापर	संचालक	९४२३७५५०००
८	श्री. डॉ.राजेश दिपचंद जैन	शहादा	संचालक	९४२२७९१५७१
९	श्री. ॲड.चंद्रशेखर मोतीलाल संचेती	शहादा	संचालक	९४२२२६३७३२
१०	श्री. राजेश तिलोकचंद नाहटा	शहादा	संचालक	९७६५०९५१००
११	श्री. किशोर हरकचंद भंडारी	धुळे	संचालक	९४२२२८९५५०
१२	श्री. राहुल नेमीचंद जैन	दोंडाईचा	संचालक	९४२२२८६३७१
१३	श्री. धनंजय प्रकाश पाटील	शहादा	संचालक	७५८८७३५९९९
१४	श्री. दिलीप गोविंद खेडकर	शहादा	संचालक	९४२२३८९१००
१५	श्री. मुकेश विजयसिंग पराडके	धडगांव	संचालक	९४२३९४४२९७
१६	श्री. गिरीष मोतिलाल जैन (दि.०३/०७/२०२५ पासून)	शहादा	संचालक	९४२३१९४४४८
१७	श्री. नरेश लालचंद जैन (सी.ए.) (दि.०९/१०/२०२५ पासून)	शहादा	संचालक	९३७००८७२२९
१८	सौ. सरीता प्रकाशचंद जैन	शहादा	संचालिका	९४२२७९१५०६
१९	सौ. रिता ललित जैन	शहादा	संचालिका	९६५७००१३४१
२०	श्री. कल्पेश नेमीचंद जैन (सी.ए.)	शहादा	तज्ञ संचालक	७५८८६२८९९९
२१	श्री. शैलेश जेठमल जैन (सी.ए.)	शहादा	तज्ञ संचालक	९९६०२२४९९०
२२	श्री. विजयकुमार हिरालाल राखेचा	शहादा	सरव्यवस्थापक	९४२२७९२५००

-: व्यवस्थापन मंडळ :-

१	श्री. प्रदीप माणकलाल टाटीया	शहादा	चेअरमन	९४२२७९२५२६
२	श्री. भरतकुमार धनराज जैन	शहादा	सदस्य	८६००४९९०९१
३	श्री. मनोज विरचंद बाफना	शहादा	सदस्य	९४२१५२९६२६
४	श्री. ॲड.अक्षय सुरेश छाजेड	शहादा	सदस्य	८०८७०२३१६७
५	श्री. फरमेश उमेश जैन (सी.ए.)	शहादा	सदस्य	८२७५२०९०७०

दि शहादा पीपल्स् को-ऑप. बँक लि.शहादा

मुख्य कार्यालय, दोंडाईचा रोड, शहादा, जि.नंदुरबार ४२५ ४०९
मोबा.नं.९३२२१९३८३५
E-mail : spcbank100@spc.bank.in

७७ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

आपल्या बँकेच्या सर्व सन्माननीय सभासदांना कळविण्यांत येते की, बँकेची **७७** वी वार्षिक सर्व साधारण सभा **दिनांक २० सप्टेंबर २०२६, रविवार रोजी दुपारी ठिक २.०० वाजता " समता भवन "** दोंडाईचा रोड, शहादा,जि.नंदुरबार येथे बँकेचे विद्यमान **प्रेसिडेंट श्री. प्रकाशचंद आसकरण जैन** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केलेली आहे. तरी सदर सभेस आपण अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

सभेपुढील विषय :-

१) दिनांक १४/०९/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडिंग वाचुन कायम करणे.
२) मार्च २०२६ अखेरचा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफातोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३) मा.संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२५-२६ चा नफा विभागणी व सभासदांना द्यावयाच्या लाभांशाला मंजूरी देणे
४) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाच्या उत्पन्न -खर्चाचे अंदाज पत्रकाच्या कमी-अधिक झालेल्या खर्चास मान्यता देवून सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.
५) वैधानिक लेखापरिक्षकांचा तपासणी अहवाल वाचून त्यावर दिलेल्या उत्तरांची नोंद घेणे.
६) रिझर्व्ह बँकचे परिपत्रक दि.२७ एप्रिल २०२१ या नूसार रिझर्व्ह बँकेस आर्थिक वर्ष २०२६-२७ करीता वैधानिक लेखापरिक्षकाच्या नेमणूकीचा प्रस्ताव पाठविल्याची नोंद घेणे बाबत.
७) जुलै २०२६ ते जुन २०२७ या कालावधीसाठी अंतर्गत हिशोब तपासणीसांची नेमणुक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८) बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांच्याकडे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात येणे बाकी असलेल्या कर्जाची माहिती घेणे.
९) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात कर्ज खात्यावर नियमित व्यवहार करणाऱ्या कर्जदारांना दिलेल्या रिबेटला मान्यता देणे.
१०) निधींची पुर्नरचना करणे बाबत.
११) ७७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१२) माननिय अध्यक्षांचे अनुज्ञेने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

ठिकाण - शहादा
दिनांक - ०३/०९/२०२६

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून,
विजयकुमार हिरालाल राखेचा
सरव्यवस्थापक
दि शहादा पीपल्स् को-ऑप.बँक लि.शहादा

सभासदांसाठी सुचना

१) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास सदर सभा त्याच जागेवर त्याच दिवशी अर्ध्या तासाने घेण्यात येईल. तेव्हा कोरमची आवश्यकता लागणार नाही व त्या सभेत वरील नोटीसी मध्ये नमुद केलेल्या विषयांचा विचार करण्यात येईल.

२) सभासदांना कामकाजाबाबत अथवा हिशेबा बाबत माहिती हवी असल्यास त्यांनी त्यासंबंधी सभेपूर्वी किमान ७ दिवस अगोदर बँकेच्या प्रशासकीय कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी पूर्व सुचना देऊन कळवणे गरजेचे आहे. आयत्यावेळी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याचे बंधन संचालक मंडळावर राहणार नाही.

३) बँकेच्या पोटनियमानूसार सभासदांनी किमान भाग/शेअर्स रु. १०००/– धारण केलेले असले पाहिजे. ज्या सभासदांची या बाबतची पुर्तता बाकी आहे त्यांनी ती त्वरीत पूर्ण करावी.

४) सभासदांनी आपल्या वारसांची नोंद केलेली नसल्यास ती त्वरीत करुन घ्यावी तसेच केवायसीची पुर्तता केली नसल्यास प्रशासकीय कार्यालयात, नजीकच्या शाखेत संपर्क साधून पुर्तता करावी.

५) ज्या सभासदांनी सन २०२२–२३ सालाचा लाभांश घेतला नसेल त्यांनी तो त्वरीत घेऊन जावे अन्यथा नियमानूसार सदर रक्कम राखीव निधीत वर्ग करण्यात येईल.

६) ज्या सभासदांनी अद्यापपावेतो शेअर्स सर्टिफिकेट घेतले नसतील त्यांनी ते बँकेच्या मुख्य कार्यालय/शाखेतून घेऊन जावे.

७) बँकेच्या वार्षिक अहवालाची प्रत तथा सभेचा अजेंडा बँकेचे मुख्य कार्यालय व शाखांच्या नोटीस बोर्डावर तसेच www.spc.bank.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

८) ज्या सभासदांचे नाव, पत्ता, ई–मेल आयडी व मोबाईल नंबर बदल झाला असल्यास त्याची माहिती त्वरीत बँकेला देवून नाव, पत्ता, ई–मेल आयडी व मोबाईल नंबर अद्यायावत करावेत.

९) प्रत्येक सभासदाने सभेस येतांना सदर सभेची नोटीस (अजेंडा) सोबत आणावा.

७७ वा वार्षिक अहवाल

सन्माननीय सभासद बंधु भगिनिंनो,

७७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने संचालक मंडळाच्यावतीने मी आपले मनपूर्वक हार्दिक स्वागत करतो. आपल्या बँकेचा सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक आपणापुढे सादर करतांना मला मनपुर्वक आनंद होत आहे.

सहकार क्षेत्राचा विकासासाठी केंद्र व राज्य शासनाद्वारे सहकार कायद्यात आमुलाग्र बदल सतत होत आहेत. विविध प्रकारचे कायदे व बंधने सांभाळून बँक व्यवस्थीत चालविणे, नफा कमविणे, थकीत कर्ज वसूल करणे, विविध कायद्यांची आणि करांची पूर्तता करून ग्राहक सेवा वाढविणे हे आता आव्हानच ठरत आहे. सदर आव्हान सक्षमतेने पेलण्यासाठी संचालक मंडळासह बँकेचे सर्व अधिकारी व कर्मचारी अहोरात्र प्रयत्न करित असल्याचा मला अभिमान आहे.

गत ७६ वर्षात पारदर्शक व्यवहार करून बँकेच्या प्रगतीचा व गुणवत्तेचा आलेख नेहमी उंच ठेवलेला आहे. सर्वच क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. आपण देखील विविध आधुनिक तंत्र साधनांच्या साह्याने बँकीग सेवा पुरवित आहोत. बँकेचा शाखा विस्तार होणे हे देखील प्रगतीचे द्योतक असून आपल्या आता १२ शाखा कार्यान्वीत आहे. सोबतच ५ शाखांमध्ये एटीएम सेवा सुरु आहे आणि सर्व शाखांमध्ये मोबाईल बँकिंग, एटीएम कार्ड, आयएमपीएस, युपीआय, फोन पे, गुगल पे, ईकॉम, पीओएस, नॅच, एईपीएस, एबीपीएस, भिम, पेटीएम आपल्या सेवेसाठी सदैव तत्पर आहे. आपल्या बँकेतील बचत खात्यात महाराष्ट्र शासनाचा लाडकी बहिण योजनेचे पैसे जमा होत आहेत तसेच सर्व सरकारी व निम सरकारी योजनांचे पैसे आपल्या बँकेतील खात्यात डीबीटी पध्दतीने जमा होतात. बँकेची होणारी प्रगती हे आपल्या सहकार्य व विश्वासामुळेच होत असून या बद्दल मी आपणा सर्वांचे आभार मानुन अभिनंदन करतो.

मार्च २०२६ अखेरीस बँकेची सांपत्तिक स्थिती पुढीलप्रमाणे

- ❊ बँकेचे सभासद :- ७६५३
- ❊ ठेवी :- १८५ कोटी ८० लाख
- ❊ वसुल भाग भांडवल :- ९ कोटी ५० लाख
- ❊ कर्जे :- १२९ कोटी ४५ लाख
- ❊ गुंतवणूक :- ७१ कोटी ७५ लाख
- ❊ खेळते भांडवल :-२१९ कोटी ९५ लाख
- ❊ ग्रॉस एन.पी.ए :- १० कोटी ९१ लाख
- ❊ थकबाकीचे प्रमाण :- १०.६६ %
- ❊ एनपीएचे प्रमाण :- ग्रॉस ८.४३% नेट ०.००%

व्यवसायीक प्रमाणके आर्थिक आकडेवारी

(रू.लाखात)

अ.नं.	तपशिल	सन २०२३-२०२४	सन २०२४-२०२५	सन २०२५-२०२६
१	भाग भांडवल (वसुल व खपलेले)	९५०.८२	९४९.९१	९२८.३१
२	निधी	१९८३.२२	२१८१.८४	२३०५.०९
३	नक्त संपत्ती	१८९६.५६	२०६३.४२	२०३९.६६
४	एकूण ठेवी	१६४०२.८७	१८१८६.२६	१८५७९.९५
५	एकूण कर्जे	११८३५.८०	१३२५९.९०	१२९४५.०४
६	गुंतवणूक	५८२८.८५	५९३७.७८	७१७४.६४
७	निव्वळ नफा	१४५.७३	१५१.२६	१२१.२५
८	प्रती सेवका मागे व्यवसाय	३१३.७६	३५३.३३	३३५.३७
९	खेळते भांडवल	१९५४२.७८	२१५३५.७४	२१९९५.५७
१०	उत्पन्नाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण	११.७८%	११.७४%	१२.०२%
११	एकूण उत्पन्न	२३०२.०५	२५२८.७९	२६४४.०२
	अ) मिळालेले व्याज	२२०५.४४	२४६५.५८	२६०८.१०
	ब) इतर उत्पन्न	९६.६८	६३.२१	१२८.९२
	क) मिळालेले व्याज उत्पन्नाचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण	११.२९%	११.४५%	११.८६%
	ड) इतर उत्पन्नाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण	०.५०%	०.२९%	०.५९%
१२	स्वभांडवल परिपुर्णता प्रमाणक (CRAR)	१६.९९%	१६.१२%	१६.३२%
१३	ठेव : कर्ज गुणोत्तर (CD Ratio)	६६.४१%	६७.१४%	६९.५४%
१४	ग्रॉस एनपीए चे एकुण कर्जाशी प्रमाण	८.६९%	८.९९%	८.४३%
१५	निव्वळ एनपीए चे एकूण निव्वळ कर्जाशी प्रमाण	०.००%	०.८५%	०.००%

आर्थिक स्थितीचा आढावा

सभासद व खपलेले भाग भांडवल :–

सभासद संख्या :– गतवर्षी अखेर म्हणजे दिनांक ३१/०३/२०२५ अखेर बँकेची एकुण सभासद संख्या ७७२३ इतकी होती. अहवाल वर्षात नवीन ५८ सभासद झाले आणि १२८ सभासदांनी विविध कारणास्तव सभासदत्वाचा राजीनामा दिला आहे. दिनांक ३१/०३/२०२६ अखेर सभासदांची एकुण संख्या ७६५३ इतकी आहे. नाममात्र सभासद (नॉमिनल मेंबर) संख्या ७५ आहे. अहवाल वर्ष अखेरीस "**अ**" वर्गाचे ७६५३ व "**ब**" वर्गाचे ७५ सभासद होते असे एकुण ७७२८ सभासद आहेत. आपल्या बँकेचे अधिकृत भाग भांडवल रु.१२.५० कोटींचे आहे. मागील वर्षी वसुल व खपलेले भाग भांडवल रू.९,४९,९१,२००/– होते. वर्ष अखेरीस रू. ९,२८,३०,९५०/– भाग भांडवल इतके आहे.

भांडवल प्रर्याप्तता, राखीव व इतर निधी :–

१) भांडवल पर्याप्तता :– भांडवल पर्याप्तता प्रमाण हा बँकींग दृष्टीने अत्यंत महत्वाचा निकष आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे अद्यायावत निकषानुसार हे प्रमाण १२% असणे आवश्यक आहे. आपले बँकेचे वैधानिक लेखापरिक्षणानूसार दिनांक ३१/०३/२०२६ रोजी बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण १६.३२% इतके आहे. यावरून बँकेची आर्थिक सदृढता आणि सक्षमता लक्षात येते आणि ते पाहता बँकेची सुरक्षितता उच्चत्तम दर्जाची असल्याची दिसून येते.

२) नक्त मुल्य :– रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या सुधारित परिपत्रकातील निकषानुसार बँकेचे किमान नक्त मुल्य (Net worth) हे रु.५००.०० लाख असणे आवश्यक आहे. आपले बँकेचे गतवर्षी नक्त मुल्य रु.१९९६.५४ लाख होते. अहवाल वर्षाअखेर म्हणजेच दि.३१/०३/२०२६ रोजी रु.२०३९.६६ कोटी आहे. बँकेचे नक्त मुल्य अधिक वाढविणेच्या दृष्टीने संचालक मंडळ, व्यवस्थापन मंडळ आणि सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग प्रयत्नशील आहे.

३) व्यावसायिक अधिकृततेसाठी पात्रता निकष Eligibility Criteria for Professional Certification (ECBA) :– भारतीय रिझर्व्ह बँक यांच्या पूर्वी आर्थिक दृष्ट्या सक्षम बँक म्हणून संबोधले जाणारे आता दि.०४/१२/२०२५ च्या परिपत्रकानुसार व्यावसायिक अधिकृततेसाठी पात्रता निकष Eligibility Criteria for Professional Certification (ECBA) म्हणून संबोधले जात आहे.

आपल्या बँकेने व्यावसायिक अधिकृततेसाठी पात्रता निकर्ष Eligibility Criteria for Professional Certification (ECBA) यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व निकषांची पुर्तता केलेली असल्याने आपली **"ECBA बँक"** आहे. हे आवार्जुन या ठिकाणी नमुद करित आहे.

४) रोख व तरल निधी :– रिझर्व्ह बँक कायदा १९४९ यामधील कलम १८ व २४ नूसार रोख निधी व तरल निधी NDTL च्या अनुक्रमे ३.००% व १८% प्रमाणे राखणे अनिवार्य असून बँकेने आर्थिक वर्षात निकषानूसार निर्देशाचे काटेकोरपणे पालन केले आहे.

५) खेळते भांडवल :– गतवर्षी अखेर बँकेचे एकुण खेळते भांडवल रु.२१५३५.७४ लाख इतके होते.त्यामध्ये अहवाल वर्षात रु.४५९.८३ लाख इतकी वाढ होऊन वर्षाअखेर रु.२१९९५.५७ लाख बँकेचे एकुण खेळते भांडवल झालेले आहे. गतवर्षाच्या काळात खेळत्या भांडवलामध्ये २.१४% वाढ झालेली आहे.

राखीव व इतर निधी

६) राखीव निधी :– राखीव निधीची उभारणी ही सहकारी कायद्यानूसार एकूण निव्वळ नफ्याचे कमीत कमी २५% तरतुद करणे आवश्यक आहे. मागील आर्थिक वर्षात बँकेचे राखीव निधी ४ कोटी ७२ लाख असून अहवाल वर्षात राखीव निधी मध्ये रु.४० लाखाने वाढ होवून दि.३१ मार्च २०२६ च्या अखेरीस बँकेचा एकूण राखीव निधी रु. ५ कोटी १२ लाख झाला आहे. बँकेच्या राखीव निधीतील वाढ ही आर्थिक सक्षमतेचे निर्दशक असल्यामुळे यावर्षी देखील कायद्यानूसार निव्वळ नफ्याचा २५% म्हणजेच या निधीपोटी रु.३० लाख नफ्यातून तरतुद सुचविली आहे.

७) बुडीत संशयित निधी :– मागील आर्थिक वर्षात ९ कोटी ४६ लाख असून अहवाल वर्षात ३६ लाखाने वाढ होवून दि.३१ मार्च २०२६ अखेर पर्यंत या निधीची उभारणी ९ कोटी ८२ लाख इतकी झालेली आहे. त्याची वाढ ३.८१% झालेली आहे. याच्या वाढीमुळे आपल्या बँकेचा नेट एन.पी.ए. ०.००% आहे.

८) इमारत निधी :– बँकेला स्वतःची इमारत बांधण्यासाठी/खरेदी करण्यासाठी ह्या निधींच्या उभारणीचा मुख्य उद्देश आहे. हा निधी भांडवल निधी म्हणून धरला जातो. बँकेच्या सभासदांना वैयक्तिक व ग्रुप कर्ज मर्यादा ठरवितांना हा निधी वसुल भागभांडवला सोबत धरला जातो. मागील आर्थिक वर्षात बँकेचा इमारत निधी रु.२ कोटी ५७ लाख असून अहवाल वर्षात रु.४१ लाख वाढ होवून दि.३१ मार्च २०२६ रोजी बँकेचा इमारत निधी रु. २ कोटी ९८ लाख इतका आहे. यावर्षी संचालक मंडळाने या निधी पोटी रु. २४ लाखाची नफ्यातून तरतुद सुचविली आहे.

९) गुंतवणूक चढउतार निधी :– आपल्या बँकेने सरकारी कर्जरोख्यांमध्ये रु.४५ कोटी ६५ लाख रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार सी.एस.जी.एल. खाते

मार्फत गुंतवणूक केली आहे. रिझर्व्ह बँकेच्या नियमानूसार एचएफटी/एएफएस मध्ये असलेल्या सरकारी कर्जरोख्या मधील गुंतवणूकीवर आयएफआर हा कमीत कमी ५% असायला पाहिजे. बँक एचएफटी/एएफएस वर्गवारीत सरकारी कर्जरोख्या मध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे. मागील आर्थिक वर्षात गुंतवणूक चढ-उतार निधी हा रु.१ कोटी ४० लाख होता. अहवाल वर्ष अखेरीस गुंतवणूक चढ-उतार निधी हा रु. १ कोटी ४० लाख आहे.. अहवाल वर्ष अखेरीस गुंतवणूक चढ उतार निधी रिझर्व्ह बँकेच्या नियमानूसार,आवश्यकतेनूसार पूर्ण असून त्या पेक्षा जास्त आहे.

१०) उत्कृष्ट कर्जावरील ०.४०% प्रमाणे तरतुद (स्टॅंडर्ड असेटस् तरतूद) :- बँकेने रिझर्व्ह बँकेच्या नियमानूसार रियल ईस्टेट कर्जावर १% व इतर कर्जावर ०.४०% प्रमाणे स्टँडर्ड असेटस्ची तरतूद करावी लागते. मागील आर्थिक वर्षात बँकेची स्टॅंडर्ड असेटस् तरतूद ५० लाख असून अहवाल वर्षात ती कायम आहे.

ठेवी :

३१ मार्च २०२५ अखेर एकूण ठेवी रू.१८१,८६,२६,०९९/- इतक्या होत्या अहवाल वर्षात ठेवी रू.३,९३,६८,५२४/- ची वाढ होवून एकूण ठेवी रू.१८५,७९,९४,६२३/- इतक्या झालेल्या आहेत. वाढीचे शेकडा प्रमाण २.१६% इतके आहे.

ठेवींची विगतवारी खालीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	ठेवींचा तपशिल	दि.३१/०३/२०२५ अखेरची ठेव रक्कम	दि.३१/०३/२०२६ अखेरची ठेव रक्कम
१	मुदतीच्या ठेवी	११८९९२६९५७.००	१२४,३३,४६,२९६.५७
२	बचत ठेवी	५१३७६३७०६.१८	५०,७३,२१,७९१.०७
३	चालू ठेवी	११४९३५४३६.४९	१०,७३,२६,५३५.७४
	एकुण	१८१८६२६०९९.६७	१८५,७९,९४,६२३.३८

भागधारक, ठेवीदार व हितचिंतक यांच्या बँकेवरील विश्वासामुळेच बँक लवकरच या वर्षाचे ठेवीचे उद्दिष्ट पुर्ण करुन २०० कोटी ठेवीचा टप्पा गाठणार याबाबत आम्हाला पुर्ण विश्वास आहे.

ठेवीवरील विमा :

सर्व प्रकारच्या ठेवींना विम्याची सुरक्षितता (रु.५ लाखा पर्यंत) :-

रिझर्व्ह बँकेच्या प्रचलित धोरणानुसार बँकेच्या सर्व ठेवीदारांना आता दि.४ फेब्रुवारी २०२० पासून रु.५ लाखांचा ठेव विमा कवच (सुरक्षा) प्राप्त झाली आहे. त्यामुळेच बँकेच्या सर्व ठेव खातेदारांना याद्वारे आर्थिक सुरक्षा प्राप्त झाली आहे. बँकेने ३० सप्टेंबर व ३१ मार्च या सहामाही अखेर डिपॉझीट इन्शुरन्स ॲण्ड क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन जो रिझर्व बँकेचा ठेव विमा विभाग आहे, त्यांना विमा प्रिमीयम न चुकता बँकेने मुदतीच्या आत पाठविला आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे :-

कालावधी	एकूण ठेवी	विमा हप्त्याची रक्कम	डिमांड ड्राफ्ट/ RTGS	पाठविल्याची तारीख
सप्टेंबर २०२५ अखेर	रु.१८३,६१,३९,५२८/-	रु.१२,९९,९८६.७८	Through RTGS	२६/११/२०२५
मार्च २०२६ अखेर	रु.१८२,३२,४९,९९४/-	रु.११,८३,२८९.२३	Through RTGS	२०/०५/२०२६

ठेवीदारांना माहितीसाठी :

डिपॉझीट इन्शुरन्स ॲण्ड क्रेडिट गॅरंटी कारपोरेशन,
रिझर्व बँक बिल्डींग , दुसरा मजला,
मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन समोर, मुंबई सेंट्रल, भायखळा, मुंबई -४०० ००८
क्लेम विभाग ०२२-२३०२८२३०, २३०२८२३६ तक्रार निवारण विभाग ०२२-२३०१९५७०
ई मेल- dicgc@rbi.org.in **वेबसाईट -** https://www.dicgc.org.in

ठेवीदार शिक्षण व जागरुकता निधी (DEAF Fund) :-

भारतीय रिझर्व्हे बँकेच्या नियमानुसार सतत १० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी हाताळणी न झालेली बचत खाते, चालु खाते विविध प्रकारच्या मुदत ठेवी व इतर जमा अशा प्रकारच्या खात्यामधील शिल्लक रक्कम भारतीय रिझर्व्हे बँकेच्या DEAF खात्यामध्ये जमा करण्यात येतात. तरी सभासद, ठेवीदार व खातेदार यांनी याबाबत नोंद घ्यावी. त्यासाठी खातेदारांनी KYC (आपला ग्राहक ओळखा) चे निकष पुर्ण करुन खात्यावर नियमित व्यवहार करण्यात यावे. अहवाल वर्षात नियमाप्रमाणे आपल्या बँकेने ७८९ खात्यांची रु.९,०६,७८६.२२ रक्कम रिझर्व्हे बँकेच्या डीईएएफ खात्यात जमा केलेली आहे. मार्च २०२६ अखेर ९३१६ खातेदारांची रु.७६,८५,३०२.९६ रक्कम रिझर्व्हे बँकेच्या डीईएएफ (DEAF) खात्यात जमा केलेली आहे. यापुढेही वेळोवेळी मागील १० वर्षात व्यवहार नसलेली खात्याची रक्कम रिझर्व्हे बँकेला वर्ग करावी लागणार आहे. तरी सर्व सभासद आणि ग्राहकांना विनंती की त्यांनी खात्यावर नियमित व्यवहार करावेत आणि बँक प्रदान करत असलेल्या सर्व सुविधा आणि सेवांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा.

अव्यवहारीक/डॉर्मंट खाते :-

भारतीय रिझर्व्हे बँकेच्या नियमानुसार सतत २ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झालेली बचत व चालू ठेव खात्यावर कोणत्याही प्रकारचा व्यवहार झाला नसेल तर सदरील खाती डॉर्मंट खाती म्हणून त्याची वर्गवारी केली जाते. सदरील खाती पुर्ववत खाते व्यवहार सुरू करण्यासाठी शाखा कार्यालयामध्ये प्रत्यक्ष जावून त्याचे निकष पुर्ण करुन खात्यावर नियमित व्यवहार करण्यात यावे.

मुदत ठेवीवरील व्याजाच्या उत्पन्नावर होणारा उद्गम कर कपात (TDS) :-

आयकर कायदा कलम ३९३ (1) SI.No.5 (ii) अन्वये बँकेच्या सर्व शाखांमध्ये ठेवलेल्या सर्व प्रकारच्या मुदत आणि आवर्त ठेवींवर वय वर्ष ६० पेक्षा कमी वय असलेल्या व्यक्तीला चालू आर्थिक वर्षात (२०२६-२७) अपेक्षीत अंदाजीत मिळणारे एकत्रित व्याज हे रु. ५०,०००/- पेक्षा जास्त होत असेल आणि तसेच वय वर्ष ६० पेक्षा जास्त वय असलेल्या (ज्येष्ठ नागरिक) व्यक्तीला चालू आर्थिक वर्षात (२०२६-२७) अपेक्षित अंदाजीत मिळणारे एकत्रित व्याज हे रु. १,००,०००/- पेक्षा जास्त होत असेल तर आयकर कायद्यातील नियमानूसार उद्गमकर (टीडीएस) कपात केला जाईल. तरी सर्व ठेवीदारांनी याची नोंद घ्याावी.

जर मुदत ठेव आणि आवर्त ठेव (रिकरिंग ठेव) ठेवणाऱ्या ठेवीदारांचे आर्थिक वर्ष २०२६-२७ यामध्ये ठेवींवर मिळणारे व्याज आणि इतर उत्पन्न असे एकूण उत्पन्न रुपये १२.०० लाखाच्या आत असल्यास सदर ठेवीदाराने फॉर्म १२१ भरुन बँकेत द्यावा. जेणेकरुन सदर ठेवीदारास मिळणाऱ्या व्याजावर आयकर कायद्यानूसार उद्गमकर (टीडीएस) कपात केला जाणार नाही. प्रत्येक ठेवीदाराचा फॉर्म १२१ भरण्यासाठी पॅन कार्ड असणे आवश्यक आहे आणि सदरील पॅन कार्ड आधार कार्डशी लिंग असणे आवश्यक आहे.

जर सदर ठेवीदाराने १२१ फॉर्म भरुन बँकेत दिला नसल्यास अशावेळी त्या ठेवीदाराला मिळणाऱ्या व्याजावर आयकर कायद्यातील नियमानूसार १०% उद्गमकर (टीडीएस) कपात केला जाईल. पॅनकार्ड दिला नसल्यास किंवा पॅन कार्ड आणि आधार कार्ड लिंक नसल्यास अशावेळेस नियमानूसार २०% उद्गमकर (टीडीएस) कपात केला जाईल. याबाबत काही अडचण असल्यास आपल्या बँकेच्या जवळच्या शाखेत संपर्क करावा.

टीप : उपरोक्त नमुद फॉर्म १२१ फक्त वैयक्तिक ग्राहकांसाठीच असून संस्था, सहकारी संस्था, ट्रस्ट, एचयुएफ आणि अन्य यांना सदरील फार्म भरता येणार नाही.

*** महत्त्वाची सुचना** – प्रत्येक खातेदाराने आपले आधार कार्ड, पॅनकार्डशी लिंक करणे गरजेचे आहे. आधार, पॅन कार्डशी लिंक नसल्यास नियमानूसार टीडीएस २०% कपात होईल.

गुंतवणूक :

गुंतवणूक : बँकींग व्यवसायामध्ये बँकेकडील ठेवी, कर्जे याच्या इतकीच बँकेची सुयोग्य गुंतवणूक हा सुध्दा तेवढाच महत्त्वाचा घटक असतो. रिझर्व्हे बँकेने सुचविलेल्या मार्गदर्शक तत्त्वानूसार व सुचनेनूसार बँकेच्या गुंतवणूकीचे धोरण (Investment Policy) ठरविले आहे. त्यामध्ये दरवर्षी रिझर्व्हे बँकेच्या सुचनेनूसार बदल केला जातो. बँकेची गुंतवणूक करतांना उत्तम तरलता (Immediate Liquidity) सुयोग्य परतावा (Reasonable Profit Return) व कमीत कमी जोखीम (Minimum Risk) या प्रमुख निकषावर केली जाते. मागील आर्थिक वर्षात बँकेची गुंतवणूक रु.५९ कोटी ३८ लाख असून अहवाल वर्षात त्यामध्ये १२ कोटी ३७ लाख वाढ होवून दि.३१ मार्च २०२६ अखेरीस गुंतवणूक रु.७१ कोटी ७५ लाख असून बँकेच्या गुंतवणूकीचे स्वतंत्र्यपणे लेखा परिक्षण केले जाते. तसेच सरकारी प्रतिभूतीचा अहवाल रिझर्व्हे बँकेला दर तिमाही नियमित पाठविला जातो. बँकेच्या गुंतवणूकीत केंद्र सरकारचे रोखे (Central Govt.Security) मध्ये गुंतवणूक रु.४५ कोटी ६५ लाख इतकी असून आय.डी.बी.आय.बँक, महाराष्ट्र स्टेट को-ऑप बँक मुंबई, एस.व्ही.सी.बँक लि., बँक ऑफ महाराष्ट्र आणि डी.डी.सी.सी. बँकेत मुदत ठेवीत रु. २६ कोटी १० लाख केलेल्या गुंतवणूकीचा समावेश आहे.

कर्जे :

व्यापार, उद्योगधंदा, स्वयंरोजगार वाढीसाठी सभासदांना कर्जे दिलेली आहेत. अहवाल वर्षाच्या अखेरीस दिलेले कर्ज रू.१२९,४५,०४,३९४.९४/- असुन रिझर्व बँकेच्या धोरणानुसार अग्रक्रम क्षेत्रांत एकुण कर्जाच्या ६७.३७% कर्ज पुरवठा केलेला आहे. तसेच दुर्बल घटक क्षेत्रात एकुण कर्जाचे ३८.०७ % कर्ज पुरवठा केलेला आहे. MSME क्षेत्राकरिता एकूण कर्जाच्या ७.५०% कर्ज वितरण करावे असे रिझर्व्ह बँकेने सुचित केले आहे. त्यानूसार आपली बँक MSME क्षेत्रातील उद्योगांसाठी कर्ज प्राधान्याने वितरित करीत आहे आणि सदर नियमांचे काटेकोरपणे पालन करीत आहे. बँकेची क्रेडिट एक्स्पोझर लिमिट १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीकरिता वैयक्तिक रू.२६६.५२ लाख व समुह रू.४४४.२० लाखाची असून बँकेने मर्यादेच्या आंतच कर्ज मंजूर व वाटप केलेले आहे. बँकेच्या कर्ज व्यवहार हा रिझर्व बँकेच्या आदेशाचे अधिन राहूनच संचालक मंडळ व कर्ज समिती करीत असते.

कर्जाची विगतवारी खालील प्रमाणे :-

अ.क्रं.	कर्जाचा तपशिल	दि.३१/०३/२०२५ अखेरची येणे कर्ज रक्कम	दि.३१/०३/२०२६ अखेरची येणे कर्ज रक्कम
१	अल्प मुदत कर्ज	१३६८३७०४६.५२	११८०५७५६७.३६
२	मध्मम मुदत कर्ज	८६२७७०२२२.६०	८४२५२१९७१.२८
३	दिर्घ मुदत कर्ज	३२६३८२२९०.८०	३३३९२४८५६.३०
	एकुण	१३२५९८९५५९.९२	१२९४५०४३९४.९४

मा.संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती.

महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७५ (२ अन्वये) आहे.

संचालक व नातेवाईक	वाटप झालेल्या कर्जापैकी अहवाल वर्षाच्या सुरुवातीस येणे कर्ज रक्कम	पैकी वसुल रक्कम	दि.३१/०३/२०२६ अखेर शिल्लक येणे कर्ज रक्कम	पैकी थकबाकी रुपये	अहवाल साली दिलेले रक्कम
संचालक	--	--	--	--	--
नातेवाईक	--	--	--	--	--

रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे बँकेच्या संचालक किंवा संचालकांचे नातेवाईक यांना अहवाल सालात कोणतेही तारणी/विनातारणी कर्ज दिलेले नाही. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनांचे आणि निर्देशांचे बँकेने तंतोतंत पालन केले आहे.

थकबाकी :

बँकेचे मुख्य उत्पन्न हे बँकेने दिलेल्या कर्जाच्या मिळणाऱ्या व्याजापासून येते. कर्ज थकित झाल्यावर त्याचा परिणाम बँकेच्या नफ्यावर होत असतो. थकलेले व्याज नफ्यात धरता येत नाही. बँकेने एकूण दिलेली कर्जे रू १२९,४५,०४,३९४/- पैकी मुदत संपल्या नंतरही कर्जचा हप्ता व व्याजाची रक्कम भरणा न करणाऱ्या कर्जदार सभासदांची संख्या १०३ असून त्यांचेकडे रू.१३,७९,३०,८४९/- ची थकबाकी आहे. ३१ मार्च २०२६ अखेर थकबाकीचे शेकडा प्रमाण १०.६६% येते. ते सुध्दा जास्तच आहे. थकबाकी ही बँकेस भुषणावह नाही. त्यामुळे नफा वाढीची क्षमता कमी होते याची जाणीव थकबाकीदार सभासदांनी ठेवावी. थकबाकीदार यांच्याकडे कर्ज वसूलीसाठी मे.सहकार न्यायालय,जळगांव तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम १०१ अन्वये मा.सहाय्यक निंबधक सहकारी संस्था यांचेकडे लवाद दावे दाखल केले असून मिळालेल्या प्रमाणपत्रांवर कलम १५६ अन्वये कडक कारवाई सुरू आहे. थकबाकीदार सभासदांनी वेळेवर कर्जाची परतफेड करावी व कायदेशीर कारवाई टाळावी अशी मी त्यांना विनंती करतो. **तसेच नियमित कर्ज फेडणाऱ्या कर्जदारास बँकेने रिबेट सवलत योजना चालु केलेली आहे त्याचाही कर्जदारांनी फायदा घ्यावा. यासाठी बँकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून सवलत प्राप्त करता येईल.**

दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर कर्ज प्रकारानूसार विगतवारी :-

(रक्कम रु. लाखात)

अ.नं.	कर्जाचा प्रकार	संख्या	३१/३/२०२५ रक्कम	संख्या	३१/३/२०२६ रक्कम
अ)	**सुरक्षीत तारण कर्ज**				
	१) घरतारण प्रापर्टी तारण	१४२	३११४.४६	१३१	३१८०.४९
	२) सोने तारण	१०८	२३१.७७	९४	२२७.२७
	३) घर बांधणी/घेणे कर्ज	१०	१२८.७५	१२	१४०.३२
	४) नजरगहाण	२५९	४४७६.७७	२२७	३८०३.३७
	५) वाहनतारण	१२३	१५६२.०३	१२९	१४९१.८४
	६) वेअर हाऊस पावती तारण	२६	८४०.३३	२२	७०१.१३
	७) औद्योगीक नजरगहाण	८७	२४०९.६२	९७	२९५७.०७
	८) सरकारी तारणपत्रावर	--	--	--	--
	९) ठेवींच्या तारणावर	७३	४०६.२१	५६	३८१.६३
	१०) सेवक घर बांधणी	--	--	--	--
	११) सुलभ कर्ज योजना	--	--	--	--
	१२) कन्झुमर कर्ज	--	--	--	--
	१३) सेवक कर्ज	३३	३५.१७	२७	१५.५३
	एकूण (अ):-	८६१	१३२०५.११	७९५	१२८९८.६५
ब)	**असुरक्षीत विना तारणी कर्ज**	२४६	५४.७९	२१०	४६.३९
	एकूण (अ)+(ब):-	११०७	१३२५९.९०	१००५	१२९४५.०४

अनुत्पादक कर्ज (NPA) :

भारतीय रिझर्व्ह बँकेने ठरवून दिलेले निव्वळ एन.पी.ए चे कमाल प्रमाण ३% व ढोबळ एन.पी.ए कमालप्रमाण ७% ठेवलेले आहे. अहवाल वर्षात बँकेने थकित कर्ज व व्याज वसूलीसाठी अथक प्रयत्न करून एन.पी.ए चे प्रमाण कमीत कमी राखण्यात काही अंशी यश मिळविले आहे. बँकेच्या एन.पी.ए.त वाढ झाली असून वर्ष अखेर ग्रॉस एन.पी.ए.८.४३% एवढा असून नेट एन.पी.ए. ०.००% एवढा आहे. याचा आवर्जुन या ठिकाणी उल्लेख करत आहे. ग्रॉस एन.पी.ए. कमी करणेसाठी बँकेतील अधिकाऱ्यांचे आणि संचालक मंडळाचे प्रयत्न सुरू असून थकबाकीदार कर्जदारांनी कर्ज परतफेड मुदतीत केल्यास बँकेच्या प्रगतीला मोठा हातभार लागणार आहे. म्हणून कर्जदार सभासदांना नम्र विनंती की, कर्ज व व्याज वेळेतच भरावे व खाते एन.पी.ए होणार नाही याची दक्षता घ्यावी. जेणे करुन बँकेची आर्थिक स्थिती मजबूत ठेवण्यात मदत होईल. अन्यथा भविष्यात थकीत कर्जदार व त्यांच्या जामीनदारांना कायदेशीर कारवाई सारख्या अनेक अडचणींचा सामना करावा लागु शकतो.

नफा :

सहकारी संस्थाच्या नफ्यावर कर आकारणी :- केंद्र सरकारने आर्थिक वर्ष २००६-०७ पासून आयकर कायदा १९६१ च्या कलम ८० पी दुरूस्तीमुळे सहकारी संस्थाच्या म्हणजेच बँकांच्या नफ्यावर कर आकारणी चालु केलेली आहे. आपली बँक त्यास अनुसरून गेल्या १६ वर्षापासून आयकर भरुन राष्ट्रीय विकास कार्यात हातभार लावीत असून आर्थिक वर्ष २०२५-२६ करीता आपल्या बँकेने रु. ९८.९४ लाख आयकर रक्कम सरकारी तिजोरीत वेळोवेळी जमा केलेली आहे.

आर्थिक वर्ष १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ अखेर पावेतो एकूण उत्पन्न रू.२६,४४,०२,११४.०३ पैसे चे मिळालेले आहे. त्यामधुन ठेवीवरील व्याज, निर्धींची तरतुद, आगऊ आयकर तसेच कार्यालयीन खर्च वजा जाता रू.१,२१,२४,९५०.२० पैसे निव्वळ नफा झालेला आहे. नफा वाटणीची संचालक मंडळाने पुढीलप्रमाणे शिफारस केलेली आहे. तरी त्यास आपली मंजुरी द्यावी.

निव्वळ नफ्याची वाटणी :

	रुपये पैसे
एकूण ढोबळ नफा	रू. २,५६,१८,४७७.२०
वजा फंडस् तरतुद	रू. ३६,००,०००.००
आयकर तरतुदीपूर्व नफा	रू. २,२०,१८,४७७.२०
वजा आयकर	रू. ९८,९३,५२७.००
निव्वळ नफा एकूण	रू.१,२१,२४,९५०.२०

वाटणी	रूपये	निव्वळ नफा रू.
		१,२१,२४,९५०.२०
१) रिझर्व फंड शे.२५% (अहवाल वर्ष नफा)		३०,३४,०२४.२०
२) लाभांश (डिव्हीडंड) शेकडा ७%		६४,३०,९२६.००
३) इमारत निधी		२३,६०,०००.००
४) निवडणूक निधी		२,००,०००.००
५) धर्मदाय निधी		१,००,०००.००
एकूण :–	**शिल्लक नफा रु.**	**वजा १,२१,२४,९५०.२०**
		निरंक

लाभांश (डिव्हिडंड) :–

बँकेने गेल्या ७६ वर्षापासून उत्कृष्ट, तत्पर व विश्वसनिय विनम्र बँकिंग सेवा भागधारक व ग्राहकांना देऊन त्यांचा बँकेप्रती विश्वास संपादन केल्यामुळे बँकेची उत्तरोत्तर निरंतर प्रगती होत आहे. बँकेच्या या यशात अर्थातच सिंहाचा वाटा हा भागधारकांचा असतो. हे लक्षात ठेवून बँकेने रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांमुळे भागधारकांना लाभांश वितरण केले आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी संचालक मंडळाची भागधारकांकरिता ७% लाभांश वाटपाची शिफारस असून हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर करतांना आम्हाला आनंद होत आहे.

बँकेने सर्व ग्राहकांसाठी राबविलेल्या विविध योजना :–

१) **मोबाईल बँकिंग सुविधा :–** आपल्या बँकेचा गुगल प्ले स्टोअरवरुन मोबाईल बँकींगचा ॲप डाऊनलोड करुन ग्राहकांना वापरता येणार आहे. त्यासाठी ग्राहकाने जवळच्या शाखेत जावून मोबाईल नंबर रजिस्टर करावा व सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा.

२) **आर.टी.जी.एस. व एन.ई.एफ.टी. सुविधा :–** आपल्या बँकेतून आर.टी.जी.एस. व एन.ई.एफ.टी. ग्राहकांना करता येणार आहे. त्यासाठी बँकेने प्रत्येक शाखेसाठी आरबीआयकडून येस बँकेमार्फत स्वतंत्र आय.एफ.सी.कोड मिळविले आहे.

३) **एस.एम.एस सुविधा :–** ग्राहकांनी आपल्या खात्यावर केलेल्या व्यवहाराची माहिती ग्राहकाच्या मोबाईल क्रमांक वर मॅसेज द्वारे मिळणार असून सदर सुविधेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांनी ज्या शाखेत खाते असेल त्या शाखेत आपला मोबाईल क्रमांक द्यावा. जेणे करून मॅसेज सुविधेचा लाभ घेता येईल व आपले होणारे व्यवहाराची माहिती, नविन योजना, ठेवीची मुदत संपत असलेली सुचना, वाढदिवसाच्या शुभेच्छा व अन्य माहिती एसएमएसद्वारे पाठविली जाते.

४) **ए.टी.एम.सेवा :–** आपल्या बँकेने आयडीबीआय बँकेमार्फत नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) यांचे कडून सब मेंबरशीप घेवून ५ शाखांमध्ये ए.टी.एम. सेवा अविरत सुरु आहे. बँकेने ए.टी.एम. कार्ड ग्राहकांना देणे सुरु केले आहे. बँकेच्या खातेधारकांना देशातील कोणत्याही बँकेच्या एटीएम मधून नगद राशी काढता येत आहे तसेच कॅशलेस व्यवहार करण्यासाठी बँकेचे RUPAY DEBIT CARD चा वापर खातेधारकांना मॉल, पेट्रोलपंप, डी-मार्ट, ऑन लाईन शॉपींग आणि अन्य ठिकाणी खरेदी करण्यासाठी उपयोग करता येईल. ३१ मार्च अखेर ५ शाखांमध्ये ए.टी.एम. सेवा अविरत सुरू आहे. तरी ग्राहकांनी नजीकच्या शाखेत जावून एटीएम कार्डची मागणी करावी आणि सदर योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा.

५) **ई–कॉम (E-COM) सुविधा :–** सदर सुविधा बँकेने मार्च २०१७ पासूनच आपल्या ATM Card धारकांना सुरु केली आहे. या सुविधे अंतर्गत खातेदार ऑनलाईन खरेदी, इलेक्ट्रीक बिल भरणा, फोन बिल भरणा, विमा भरणा, रेल्वे रिझर्व्हेशन, मोबाईल रिचार्ज इत्यादी सुविधेचा उपयोग मोठ्या प्रमाणात करीत आहेत.

६) **सर्वत्र कार्ड सेफ ॲप सुविधा :–** बँकेच्या सर्व रुपे ए.टी.एम. कार्ड धारकांकरीता बँकेने कार्ड सेफ ॲप सुविधा सुरु केली असून बँकेच्या सर्व ग्राहकांनी त्याचा लाभ घ्यावा. सदर सुविधेमध्ये आपल्या खात्यातून ए.टी.एम., पी.ओ.एस., ई–कॉम मधील रकमेची मर्यादा कमी किंवा जास्त करण्याची सोय ग्राहकांच्या हाती आहे तसेच सदर सुविधेमध्ये केव्हाही ग्राहक त्यांच्या ए.टी.एम.चा पिन बदलू शकतो. सदर सुविधेमुळे सायबर गुन्हेगारीपासून ग्राहक स्वतःच्या खात्याची सुरक्षा स्वतः करु शकतो.

७) **आय.एम.पी.एस. सुविधा :–** IMPS (Immediate Payment System) ही सुविधा बँकेने मार्च २०२१ पासून बँकेच्या ग्राहकांसाठी सुरु केली आहे. या सुविधेमध्ये खातेदाराला बँकेत जावून P2P म्हणजे MMID व Mobile No. सांगून रक्कम पाठविता किंवा मागविता येते तसेच P2A म्हणजे IFSC Code व Mobile No. सांगून रक्कम पाठविता किंवा मागविता येते.

८) **चेक ट्रंकेशन सिस्टिम (CTS) सुविधा :–** रिझर्व्ह बँकेने क्लिअरिंगच्या पुर्वापार चालू असलेल्या पध्दतीमध्ये चेक कलेक्शनसाठी लागणारा वेळ क्लिअरिंगमध्ये होणाऱ्या फसवणूकी व गैरव्यवहार टाळण्यासाठी चेक ट्रंकेशन सिस्टिम चालू केली आहे. नमुद CTS योजना आपल्या बँकेने बँकेच्या सर्व शाखांमध्ये चालू केली आहे. या सुविधांकरीता बँकेने IDBI बँकेची सबमेंबरशिप घेतलेली आहे. CTS 2010 मानकाप्रमाणे बचत खाते, चालू खाते, कॅश क्रेडीट कर्ज खाते, हायपोथिकेशन कर्ज खाते तसेच इतर सर्व खाते यांना चेकबुक सुविधा उपलब्ध आहे.

९) **मोबाईल बँकींग सुविधा :–** आपल्या बँकेने मोबाईल बँकींग सुविधा जानेवारी २०१८ पासून सुरु केलेली असून सदर सुविधेमध्ये खातेदार कुठूनही (२४ X ७ X ३३५) बँकींग व्यवहार करु शकतो.

१०) **UPI सुविधा :–** आपल्या बँकेने UPI सुविधा सुरु केलेली आहे. बचत खातेदार, चालू खातेदार (Current Account) जास्तीत जास्त ग्राहक सदर सुविधेचा लाभ घेत आहेत.

११) **QR Code सुविधा :–** आपल्या बँकेने ग्राहकांसाठी QR Code ची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.

१२) **आधार ब्रीज पेमेंट सिस्टीम व नॅशनल ऑटोमेटेड क्लिअरिंग हाऊस सिस्टीम (ABPS/NACH) सुविधा :–** बँकेने NPCI च्या मान्यतेने बँकेच्या खातेधारकांना आधार ब्रिज पेमेंट सिस्टीम द्वारे LPG सबसिडी, शैक्षणिक शिष्यवृत्ती, केंद्रशासन व राज्यशासन सरकारी/निमसरकारी अनुदान रक्कम खात्यात थेट जमा करण्याची सोय उपलब्ध करुन दिली आहे. शासनाच्या धोरणाप्रमाणे LPG सबसिडीची रक्कम मोठ्या प्रमाणावर बँकेच्या खातेधारकांच्या खात्यामध्ये जमा होत आहे. महाराष्ट्र राज्य शासनाची लाडकी बहिण योजनेचे अनुदान आपल्या बँकेतील बचत खात्यात रक्कम जमा होत आहे. तसेच शेतकरी बांधवांच्या खात्यात शासनाच्या वेगवेगळ्या योजनेंतर्गत पैसे जमा होण्याची सुविधा उपलब्ध आहे.

१३) **आपला ग्राहक जाणून घ्या (Know Your Customer-KYC) :–** रिझर्व्ह बँकेने बँकेत उघडण्यात येणाऱ्या खात्यासंबंधी वेळोवेळी के.वाय.सी. विषयी विविध मार्गदर्शक सुचना लागू केल्या आहेत. ज्यांचे आपली बँक पालन करीत आहे. तरी भागधारकांना विनंती करण्यात येते की, ज्या भागधारकांनी अद्यापही KYC ची पुर्तता केली नसेल त्यांनी त्वरीत पुर्तता करुन बँकेला सहकार्य करावे. रिझर्व्ह बँकेने प्रत्येक खातेदाराचे PAN Card सह आधार कार्ड घेणे अनिवार्य केले आहे.

१४) **रिबेट योजना :–** जर कर्जव्यवहार बँकेने निर्धारीत केलेल्या नियमांत बसत असेल तर कर्जदारांना दि.०१/०४/२०२६ पासून व्याजदरात २% सुट देण्यात येते. अहवाल वर्षात बँकेने रू.२,३९,८६,८६७/– इतके रिबेट त्यांचे कर्ज खात्यात जमा केलेले आहे. सदर योजनेमुळे कर्ज खाती नियमीत असून त्यामुळे थकबाकीचे प्रमाण कमी करण्यास मदत झालेली आहे.

१५) **सेफडिपॉझीट लॉकर्स :–** नियमीत बँकींग कामकाजा व्यतिरिक्त बँकेने शाखांमध्ये खातेदाराच्या, सभासदाच्या तसेच शाखाच्या आजूबाजूच्या विभागातील जनतेच्या सोयीसाठी मुख्य शाखा, मार्केट यार्ड शाखा, तळोदा शाखा व धुळे शाखेत लॉकर्सची सेवा उपलब्ध केलेली आहे.

१६) **ड्राफ्ट योजना :–** बँकेने आय.डी.बी.आय.बँक आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांचे सहकार्याने ड्राफ्ट योजना सुरू केलेली आहे. भारतातील कोणत्याही लहान मोठ्या शहरावरील ड्राफ्ट या योजने अतंर्गत देवू शकतो.

१७) **सभासदांचा जनता अपघात विमा :–** सभासदांना झळ न देता बँकेने स्वखर्चाने जनता अपघात विमा काढलेला आहे. बँकेने सभासदांसाठी सुरू केलेली कल्याणकारी योजना असून आतापर्यत अनेक अपघाती मृत सभासदांच्या वारसदारांना प्रत्येकी रू.१,००,०००/– या प्रमाणे वेळोवेळी मदत देण्यांत आलेली आहे.

१८) सर्व ग्राहकांना अधिकृत ई–मेल आयडीवर मासिक, तिमाही, अर्ध वार्षिक आणि वार्षिक पध्दतीने खाते उतारा प्राप्त करण्याची सुविधा उपलब्ध आहे. तरी ग्राहकांनी या सेवेचा लाभ घ्यावा.

१९) **स्थायी सुचना (Standing Instructrion) –** ग्राहकांना त्यांच्या बचत किंवा चालू खात्यातील आवर्ती खाते (Recurring Deposit) आणि कर्ज खात्यात आपल्या संमतीने वर्ग (वळती) करण्याची सुविधा सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहे.

कोअर बँकिंग :–

रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार कोअर बँकिग प्रणालीचे सॉफ्टवेअर असणे बंधनकारक आहे. त्यात सर्व प्रकारची माहिती आणि रिपोर्ट हे संगणकीय प्रणालीद्वारे मिळणे आवश्यक आहे. त्यात कुठल्याही प्रकारचे मानवीय हस्तक्षेप न करता अद्यायावत तथा बिनचुक माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने आपली बँक, संचालक मंडळ तथा सॉफ्टवेअर कंपनी हे सर्व प्रयत्नशील आहेत आणि असणार. आपल्या बँकेने कोअर बँकिंग प्रणाली सुरू केली असून या प्रणालीला बँकेच्या सर्व शाखा जोडल्या गेल्या आहेत. आता ग्राहकांना कोणत्याही शाखेतून आपला बँकिंग व्यवहार करणे सोयीचे झाले आहे. आपले कोअर बँकिंगचे सॉफ्टवेअर हे ग्राहकांना उत्तम सेवा देत आहे. ABB व IBT बँकिंग सुविधा आणि बँकेच्या कोणत्याही शाखेतुन पैसे काढण्याची अथवा जमा करण्याची सुविधा उपलब्ध आहे. तसेच डिजीटल बँकींग सेवा, मोबाईल बँकींग, एटीएम कार्ड, आयएमपीएस, युपीआय आणि अन्य सेवा सुरु केल्या आहेत.

वैधानिक लेखापरिक्षण :–

दिनांक १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ ह्या मुदतीचे वैधानिक लेखापरिक्षण **मे.एन.व्ही.एम.ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौन्टन्टस् पुणे** यांनी बारकाईने केलेले आहे. बँकेचे कामकाज, व्यवसायीक प्रमाणके, एन.पी.ए. या सर्व बाबींचा विचार करून कॅमल रेटींग नुसार अहवाल वर्षात "**अ**" ऑडिट वर्ग दिला आहे. ही बाब बँकेस गौरवास्पद आहे.

अंतर्गत लेखापरिक्षण :–

बँकेचे दिनांक ०१ जुलै २०२५ ते ३० जुन २०२६ पर्यंतचे मुख्य कार्यालय तसेच सर्व शाखांचे अंतर्गत लेखापरिक्षण **मे.डी.सी.सी.ॲण्ड असोसिएटस् कंपनी, चार्टड अकौन्टन्टस्,नाशिक** यांनी केले असून तपासणी अहवाल सादर केले आहेत.

संचालक मंडळ :–

बँकेचे संचालक मंडळ अत्यंत उत्साही व अभ्यासू लाभले आहेत. अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण १३ सभा संपन्न झाल्या. विषय पत्रिके वरील सर्व विषयांना संचालक मंडळाने तोला मोलाची चर्चा करून मंजूरी दिलेली असून सभेतील कामकाज खेळीमेळीचे वातावरणात पार पाडले आहेत. त्यातील सर्व निर्णय सर्वानुमते घेण्यात आलेले असून बँकेचे व्हाईस प्रेसिडेंट श्री.गौतमचंद अनोपचंद जैन तथा सर्व सन्माननिय संचालक मंडळ सदस्यांनी अतिशय उस्फूर्तपणे बँकेच्या कामकाजात सहभाग नोंदविला आहे. पिंपळनेर, दोंडाईचा, शिरपुर, नंदुरबार, शिंदखेडा, म्हसावद, धडगांव व अक्कलकुवा शाखेच्या सल्लागार समिती व बँकेचे संचालक यांनी अभ्यासू मार्गदर्शन व सहकार्य केलेले आहे. त्याबद्दल मी संचालक मंडळाचे तसेच सर्व सल्लागार समितीच्या सदस्यांचे आभार व्यक्त करतो.

बँकेचे सर्व कर्मचारी वर्ग आपल्या कर्तव्याचे पालन जबाबदारीपूर्वक करीत आहेत. बँकेचे सरव्यवस्थापक श्री.विजयकुमार हिरालाल राखेचा व त्यांचे सहकारी उप सरव्यवस्थापक श्री.जे.पी.जैन, व्यवस्थापक श्री.एस.एल.जाधव, आय.टी. व्यवस्थापक श्री.एल.झेड. चौधरी, मुख्य शाखा व्यवस्थापक श्री.एम.एल.पठाण, मार्केट मार्ड शाखा व्यवस्थापक व विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री.पी.एच.शिंपी, तळोदा शाखा व्यवस्थापक श्री.अे.सी.कोचर, धुळे शाखा व्यवस्थापक श्री.एन.जे. बाफना, पिंपळनेर शाखा व्यवस्थापक श्री.एस.डब्लू.चकोर, दोंडाईचा शाखा व्यवस्थापक श्री.सी.आर.पाटील, शिरपुर शाखा श्री.एस.ए.मलीक, नंदुरबार शाखा व्यवस्थापक श्री.के.एस.तेली, शिंदखेडा शाखा व्यवस्थापक श्री.एल .एच.धनगर, म्हसावद शाखा व्यवस्थापक श्री.डी.पी.पाटील, धडगांव शाखा व्यवस्थापक श्री आर.डी.जगताप व अक्कलकुवा शाखा व्यवस्थापक श्री.एम.के.नाईक तसेच दुय्यम अधिकारी इतर सर्व कर्मचारी बंधु-भगिनींनी बँकेच्या कामात लक्ष घालून एकजूटीने काम करून बँकेच्या लौकीकात भर घातलेली आहे.

सेवक व प्रशिक्षण:– सेवक वर्गाची गुणवत्ता वाढविणेच्या दृष्टीने सहकार खात्यातर्फे तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर बँकिंग पुणे, राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन, फेडरेशन आणि इतर संस्थांनी बँकिंग क्षेत्रात होणारे बदल व त्यांची अंमलबजावणी करण्याकरिता वेळोवेळी या संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण संचालक मंडळ, अधिकारी आणि कर्मचारी यांचे नामांकन करुन त्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. बँकिंग व्यवसायात होणारे बदल व त्याची अंमलबजावणी हे महत्वाचे कार्य सेवकांवर अवलंबून आहे. तसेच बँकींग व्यवसायात वृध्दींगत होणेच्या दृष्टीने सभासदांना देखील प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने बँकेच्या माध्यमातून सदरचे कामकाज चालू आहे.

शाखाविस्तार:– आपले बँकेचे कार्यक्षेत्र धुळे व नंदुरबार जिल्ह्यात आहे. आपल्या बँकेच्या १) मुख्य शाखा,शहादा २) मार्केट यार्ड शाखा, शहादा ३) तळोदा ४) धुळे ५) पिंपळनेर ६) दोंडाईचा ७) शिरपुर ८) नंदुरबार ९) शिंदखेडा १०) म्हसावद ११) धडगांव १२) अक्कलकुवा अशा एकुण १२ शाखा आहेत.

आभार व समारोप :–

बँकेच्या प्रगतीत अनेक मान्यवर व्यक्ती, अधिकारी, हितचिंतक व संस्था यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभलेले आहे. त्यांचे आभार व्यक्त करणे हे माझे आद्य कर्तव्य आहे असे मी समजतो.

मा.विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था नाशिक श्री.संभाजी निकम साहेब तसेच मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे श्री.मनोज चौधरी सो., मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नंदुरबार श्री.एस.वाय. पुरी सो., मा.जिल्हाधिकारी धुळे सौ.भाग्यश्री विसपुते सो., मा. जिल्हाधिकारी नंदुरबार मिताली सेठी सो., मा.सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था नंदुरबार राजकुमार राठोड सो., तळोदा व अक्कलकुवा मा.श्री.सागर गवांदे, मा.सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था शहादा, मा.गिरीश महाले सो., मा. तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था धुळे व मा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था साक्री श्री.मुकेशकुमार शहा सो., मा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था शिरपूर श्री.राजेंद्र विरकर, मा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था शिंदखेडा श्री.डी.ए.शिरगावे सो, मा.उपविभागीय अधिकारी श्री.दीपक गिरासे सो., मा.तहसिलदार शहादा श्री.संभाजी शिवाजी पाटील सो. व मा.मुख्याधिकारी सो.शहादा नगर पालिका शहादा श्री.साजीद पिंजारी सो., मा. अधिकारी वर्गाने बँकेच्या कामकाजात मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केलेले आहे त्यांचेही मी आभार मानतो.

भारतीय रिझर्व्ह बँक मुंबई व नागपूर विभाग, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबई, नॅशनल फेडरेशन दिल्ली (NAFCUB), महाराष्ट्र सहकारी बँक्स असोसिऐशन लि., महाराष्ट्र राज्य नागरी बँक फेडरेशन, नॅशनल पेमेंट कॉरपोरेशन ऑफ इंडिया (NPCI) बँकेच्या कार्य क्षेत्रातील स्टेट बँक ऑफइंडिया, धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, आय.डि.बी.आय.बँक, एच.डी.एफ.सी.बँक, बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ महाराष्ट्र , युनियन बँक ऑफ इंडिया, येस बँक व एस.व्ही.सी. बँक इ. बँकांचे /संस्थाचे अधिकारी व कर्मचारी वर्गाने बँकेच्या कामकाजात मार्गदर्शन व सहकार्य केलेले आहे. या सर्वांचे मी आभार व्यक्त करतो.

आपल्या बँकेच्या दैनदिन कामकाजात बँकेचे सन्माननिय संचालक मंडळाचा तसेच शाखा सल्लागार समिती सदस्यांचा अनुभवाचा व मार्गदर्शनाचा बँकेस लाभ झालेला आहे. तसेच सरव्यवस्थापक, उपसरव्यवस्थापक, सर्व शाखाधिकारी, दुय्यम अधिकारी व कर्मचारी बंधु भगिनी यांनी बँकेचे दैनदिन कामकाज संचालक मंडळाच्या ध्येय धोरणानुसार व्यवस्थित व अचुक करून बँकेचे सन्माननिय सभासद, ग्राहक, ठेवीदार यांना तत्पर सेवा प्रदान केली. या बद्दल सर्वाचे मी आभार व्यक्त करतो.

सभासद बंधु भगिनींनी माझ्यावर विश्वास ठेवून बँकेच्या प्रेसिडेंट पदाची जबाबदारी सोपविली आहे त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे. बँकेचे कामकाज रिझर्व्ह बँकेच्या निर्देशास अनुसरूनच आणि महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम १९६० आणि नियम १९६१ नूसारच दैनंदिन कामकाज करण्यात येते. कोणत्याही नियमाचे कायद्याचे उल्लंघन होणार नाही. याची आर्वाजून दक्षता घेण्यात येते.

बँकेची उत्तरोत्तर प्रगती व विकास होत राहावा म्हणून मी कर्तव्य तत्पर राहिल. मला एकजूटीने सहकार्य करावे. बँकेचा असाच उत्कर्ष होत राहो व प्रगतीचा आलेख नेहमी चढता राहो हीच हार्दिक सदिच्छा व्यक्त करून मी माझा अहवाल पूर्ण करतो.

जय हिंद ! **जय महाराष्ट्र !!** **जय सहकार !!!**

श्री. प्रकाशचंद आसकरण जैन
प्रेसिडेंट, दि शहादा पीपल्स् को-ऑप. बँक लि. शहादा

Annexure I
Form A
Form of "Balance Sheet"
Balance Sheet of THE SHAHADA PEOPLES CO-OPERATIVE BANK LTD. SHAHADA
Balance as on 31st March 2026

Particulars	तपशिल	Schedule	As on 31-3-2026 (Current Year)	As on 31-3-2025 (Previous Year)
Capital And Liabilities	**भांडवल व देणे**			
Capital	भांडवल	1	9,28,30,950.00	9,49,91,200.00
Reserves And Surplus	राखीव व इतर निधी	2	24,26,34,318.58	23,33,09,930,38
Deposits	ठेवी	3	1,85,79,94,623.38	1,81,86,26,099.67
Borrowings	कर्जे		—-	—-
Overdue Interest Reserve	थकीत व्याज निधी	4	16,78,47,337.00	12,84,54,820.00
Interest Payable On Deposits	व्याज देणे		34,18,105.00	34,18,105.00
Other Liabilities And Provisions	इतर देणी	5	1,03,64,764.44	1,00,07,319.61
Bills For Payments	बिल्स् फॉर पेमेंट		—-	—-
Total (Liabilities)	एकूण (देणे)		**2,37,50,90,098.40**	**2,28,88,07,474.66**
Assets	**मालमत्ता व येणे**			
Cash And Balances With Reserve Bank Of India	रोख व रिझर्व्ह बँकेतील शिल्लक	6	10,31,84,734.30	10,82,92,128.80
Balance With Other Banks & Money At Call & Short Notice	अन्य बँकांतील शिल्लक, कॉल आणि शॉर्ट नोटीस मनी	7	30,83,16,248.68	29,30,55,156.62
Investments	गुंतवणूक	8	45,65,85,636.00	38,85,78,190.00
Loans And Advances	कर्जे	9	1,29,45,04,394.94	1,32,59,89,559.92
Fixed Assets	स्थावर व जंगम मालमत्ता	10	1,64,75,836.67	1,75,77,056.30
Other Assets	इतर मालमत्ता	11	19,60,23,247.81	15,53,15,383.02
Bills For Collection	बिल्स फॉर कलेक्शन		—-	—-
Total (Assets)	एकूण (मालमत्ता)		**2,37,50,90,098.40**	**2,28,88,07,474.66**
Contingent Liabilities	कॉन्टीजन देणे	12	0.00	0.00

Shri.Gautamchand A. Jain
Vice President

Shri.Prakashchand A. Jain
President

CA Shailesh J. Jain
Expert Director

Shri.Pradip M. Tatiya
Director & Board of Manegment Chairman

CA Kalpesh N. Jain
Expert Director

Shri.Jitendra. P. Jain
Asst.General Manager

Shri.Vijaykumar H. Rakhecha
General Manager

For NVM & ASSOCIATES
Chartered Accoutants
FRN:120649W
CA Ashish Bihani
Partner, M.No:131595
Place: Pune,
Date:22.06.2026
UDIN:26131595LKLGKL4746

Annexure I
Form B
Form of Profit and Loss Account for the year ended on "31st March 2026"

Particulars	तपशिल	Schedule	As on 31-3-2026 (Current Year)	As on 31-3-2025 (Previous Year)
Income :-	**उत्पन्न**			
Interest Earned	कर्ज व गुंतवणूकीवरील व्याज	13	19,86,69,836.32	19,87,13,153.00
Other Income	इतर उत्पन्न	14	1,28,91,721.16	69,79,410.78
